**आजचा सुविचार**

शिक्षणाने माणसात सर्जनशीलता येते.
सर्जनशीलतेने तुमच्यात प्रगल्भ विचार येतात.
विचाराने ज्ञान वाढते, आणि
ज्ञानाने माणूस महान बनतो...

दैनिक

# अक्षराज

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com

आतील पानात वाचा...



चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू

● वर्ष ०२ रे ● अंक ३५४ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, सोमवार, दि.१३ ऑक्टोबर २०२५ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 02 ● ISSUE : 354 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Monday, 13 October 2025 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023


## वाचक पत्र

### मृत्यूस कारणीभूत ठरणारी औषधांमधील हेराफेरी थांबेल याची गॅरंटी काय ?

भारतात खोकल्याच्या औषधासंदर्भात अर्थात कफ सिरपवर सातत्याने सवाल उपस्थित होतो आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशात कफ सिरपचे सेवन केल्याने अनेक मुलांना जीव गमवावा लागला आहे. महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्येही अशी प्रकरणे समोर येत असल्याने केंद्रासह अनेक राज्यांनी काही कफ सिरपवर बंदी घातली असली तरी औषधांमधील हेराफेरी पूर्णपणे नष्ट होईल याची खात्री देता येत नाही हेचं या घटनेवरुन समोर येत आहे.

घडलेल्या घटनेबद्दल जनतेतून मोठा संताप व्यक्त केला जात आहे. देशात पुन्हा एकदा या प्रकरणावरुन गदारोळ माजला आहे यावेळी कोल्ड्रिफ सिरपचे प्रकरण आहे या सिरपच्या एका खेपमध्ये डायएथिलिन ग्लायकॉल ( डिईजी) नावाचे धोकादायक रसायन आढळून आले आहे. हे रसायन शरीरात पोहचल्यास ते किडनी फेल्योर, लिव्हर डॅमेज यांसह मृत्येचे कारण देखील बनते. त्यामूळे घडलेली हि घटना किती धोकादायक आहे हे दिसून येते. कफ सिरफ कोल्ड्रिफ कंपनी तमिळनाडूमधील श्रीपेरंबुदूरच्या भागात श्रीसन फार्मास्यूटिकल्स या नांवाने कार्यरत होती. मात्र घटनेवरुन टाळे ठोकण्यात आले आहे हि घटना काय नवखी नाहि या अगोदर देखील असले प्रकार घडले आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियामक मंडळ असते. मात्र त्याची कामगिरी योग्य होईल की नाही याची खात्री देता येत नाही हे या प्रकरणावरुन अधोरेखित होते आहे. जर असल्या मृत्यूच्या घटना घडल्यानंतरचं मंडळ जागे होणार असेल तर ते काय कामाचे, आर्थिक व्यवहार सोपस्कर करुन परवाना देणे यासारखे प्रकार घडत असतील तर ते जिवावर उठणारं आहेत. सर्दी खोकला झाला म्हणून लगेच विना डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधं घेणे हे सुद्धा महागात पडू शकते. त्यासाठी आजारी व्यक्तींनी खबरदारी घेवून औषधांचा वापर करणे गरजेचे आहे.

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

# पी चिदंबरम यांचं इंदिरा गांधींबद्दल धक्कादायक वक्तव्य



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा देशाचे माजी गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याबद्दल धक्कादायक वक्तव्य केलं आहे. ऑपरेशन ब्लू स्टार ही मोठी चूक होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना त्यासाठी आपला जीव देवून त्याची किंमत चुकवावी लागली, असं वक्तव्य चिदंबरम यांनी केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरातून दहशतवाद्यांना हुसकावण्यासाठी लष्करी कारवाई करणं चुकीचं होतं, असं पी चिदंबरम यांनी म्हटलं आहे. हिमाचल प्रदेशच्या कसौली येथे खुशवत सिंग साहित्य महोत्सवात त्यांनी हे वक्तव्य केलं. 'दे विल शूट यू मॅडम' या पुस्तकाच्या परिसंवादाच्या कार्यक्रमात पी चिदंबरम बोलत होते. या ऑपरेशनबाबत केवळ इंदिरा गांधी यांना दोष देणं चुकीचं आहे, असंही पी चिदंबरम म्हणाले.

**पी.चिदंबरम नेमकं काय म्हणाले ?**

अमृतसरचं सुवर्ण मंदिर दहशतवाद्यांच्या तावडीतून सोडवण्यासाठी अन्य मार्गही होते. पण ऑपरेशन ब्लू स्टार हा चुकीचा मार्ग होता. त्यामुळे इंदिरा गांधी यांना त्या चुकीसाठी स्वत:चा जीव द्यावा लागला हे मी मान्य करतो. पण तो निर्णय एकट्या इंदिरा गांधी यांचा नव्हता. लष्कर, पोलीस, गुप्तहेर यंत्रणा, प्रशासकीय यंत्रणा यांचा एकत्रित होता. त्यासाठी केवळ इंदिरा गांधी यांना दोष देता येणार नाही, असं वक्तव्य पी चिदंबरम यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यावरुन नवा वाद निर्माण झाला आहे.

## काँग्रेसमध्ये मोठी खळबळ!

पी. चिदंबरम यांची अशाप्रकारे वादग्रस्त वक्तव्ये करण्याची ही पहिली वेळ नाही. याआधीदेखील त्यांनी अशाप्रकारे वादग्रस्त वक्तव्ये केली आहेत. त्यामुळे काँग्रेसचे पक्षश्रेष्ठी चिदंबरम यांच्यावर नाराज असल्याची माहिती समोर येत आहे. चिदंबरम वारंवार अशी वक्तव्य का करत आहेत? असा सवाल पक्षश्रेष्ठींना केला आहे. पक्षाने त्यांना सर्वकाही दिलं. त्यांनी अशी वक्तव्ये टाळायला हवीत, अशी ताकीद पक्षाने त्यांना दिल्याची चर्चा आहे.

काँग्रेसने ज्यांना सर्व काही दिलं असे नेते वारंवार पक्षाला अडचणीत आणणारे वक्तव्य करायला नकोत. सार्वजनिक प्रतिक्रिया देताना विचार करुन प्रतिक्रिया द्यायला हवी. कारण अशा वक्तव्याने पक्षाला अडचणीला सामना करावा लागतो. जे चुकीचं आहे, अशी काँग्रेस नेतृत्वाची भावना आहे. विशेष म्हणजे पक्षाचं नेतृत्व चिदंबरम यांच्यावर नाराज आहे. वरिष्ठ पातळीवर चिदंबरम यांच्या वक्तव्याची चर्चा होत आहे.

**काँग्रेस नेते राशीद अल्वी यांची प्रतिक्रिया...**

काँग्रेस नेते राशीद अल्वी यांनी एएनआय वृत्तसंस्थेला प्रतिक्रिया दिली आहे. पी चिदंबरम काँग्रेसच्या विरोधात बोलून काँग्रेसला कमोजर का करत आहेत? विशेष म्हणजे बिहार निवडणुका जवळ आलेल्या असताना अशाप्रकारची वक्तव्ये त्यांच्याकडून केली जात आहेत. यामुळे निवडणुकीत काँग्रेसला नुकसान पोहोचू शकतं. ते अशाप्रकारचे वक्तव्ये का करत आहेत? भाजप गेल्या १२ वर्षापासून देशाला बरबाद करत आहे. यावर बोलायला हवं. आपण विपक्षात आहोत, अशी प्रतिक्रिया राशीद अल्वी यांनी दिली.

# वातावरण बिघडवणं हाच भाजपचा अजेंडा – खा.ओवेसी

## मुख्यमंत्र्यांकडून अतिवृष्टीग्रस्तांना दिलासा नाही



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** भाजपाचा सुरूवातीपासूनच अजेंडा समाजात वातावरण बिघडविण्याचा राहिला आहे, असा आरोप एमआयएमचे प्रमुख खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी केला आहे. महाराष्ट्रातील अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांची दयनीय अवस्था असूनही मुख्यमंत्री फक्त आश्वासनांची भाषा बोलत आहेत, कर्जमाफीची ठोस घोषणा केलेली नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर भागात खा. ओवेसी यांची सभा गुरूवारी सायंकाळी झाली. त्यापूर्वी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ओवेसी म्हणाले, महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली, शेतकरी हवालदिल झाला आहे. मुख्यमंत्री एकीकडे शेतकर्यांना भेटतात, पण दुसरीकडे फक्त आश्वासन देतात.

त्यांना प्रत्यक्ष मदतीची गरज आहे, घोषणांची नव्हे. ओवेसी पुढे म्हणाले, 'आय लव्ह मोहम्मद' या वाक्यात कोणताही विवाद नाही. या देशातील ९० टक्के लोक धर्म, जाती, पंथ मानतात आणि आपल्या धर्मावर प्रेम करतात. मग 'लव्ह' हा शब्द वापरल्याने काहींना त्रास का होतो? आमच्या धर्मात पैगंबर मोहम्मद यांच्यावर अपार प्रेम आहे. कायदा हातात घेणार्यांचा आम्ही विरोध करतो, पण इतरांच्या श्रध्दांवर गदा आणणे चुकीचे आहे. भाजपाने समजून घ्यावे की संविधानातील कलम १९ आणि २५ ही अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्य यासाठी आहेत. मग कोणावर प्रेम करायचे हे सांगण्याचा अधिकार तुम्ही का घेताय ?

ओवेसी म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट फेकण्याची घटना ही केवळ न्यायव्यवस्थेचा नव्हे तर दलित समाजाचाही अपमान आहे. अशा प्रकारच्या कृतींनी न्यायसंस्थेचा अपमान होतो, ज्याचा निषेध केला पाहिजे. लडाखमधील परिस्थितीवर बोलताना ओवेसी म्हणाले, लडाखमधील लोक आपली मागणी करत आहेत,ती सरकारने ऐकावी.

राज्याच्या राजकारणावर भाष्य करताना ओवेसी म्हणाले, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीनंतर अनेक घडामोडी घडल्या. राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. जे पूर्वी शिव्या देत होते,त्यांनाच मंत्री करण्यात आले,ही दुर्दैवी बाब असल्याचे ते म्हणाले.

# रत्नागिरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन



> आजचा क्षण महत्त्वाचा आणि ऐतिहासिक आहे. न्यायमूर्ती म्हणून मला २२ वर्षे पूर्ण झाली आहेत. कोल्हापूर खंडपीठाचे उद्घाटन आणि आजच्या मंडणगड न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन हे दोन्ही कार्यक्रम माझ्या २२ वर्षाच्या सेवेमधील महत्त्वाचे आहेत. अतिशय कमी वेळेत येथे न्यायालय सुरु करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. मंडणगड न्यायालयाच्या भूमिपूजन आणि आजच्या उद्घाटन समारंभासही आम्ही दोघे उपस्थित आहोत, हा गौरवाचा क्षण आहे. अवघ्या २० दिवसात कोल्हापुरातील जुन्या इमारतीचा कायापालट करुन खंडपीठ सुरु केले. देशातल्या कुठल्याही तालुक्यात नसतील एवढ्या सुंदर इमारती महाराष्ट्र शासनाने उभ्या केल्या आहेत
>
> **– सरन्यायाधीश भूषण गवई**

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मंडणगड (रत्नागिरी) :** येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते झाले. या इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत, कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्नशील रहाल; जेणेकरुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक आणि आर्थिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल, अशी अपेक्षा सरन्यायाधीश गवई यांनी व्यक्त केली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री डॉ. उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, पालक न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस. पी. तावडे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनोद जाधव, दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमृता जोशी, बार असोसिएशनचे अध्यक्ष अमोल सावंत, सदस्य संग्राम देसाई, वकील संघाचे अध्यक्ष मिलींद लोखंडे, आमदार किरण सामंत, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी मनुज जिंदल आदी उपस्थित होते.

सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते कळ दाबून न्यायालय इमारत प्रांगणातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे तसेच म्युरलचे, कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. न्यायदान कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश श्रीमती जोशी यांना आसनावर विराजमान करण्यात आले. येथील ग्रंथालयाचेही उद्घाटन आणि पाहणी सरन्यायाधीशांनी यावेळी केली.

# ८.१२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ ची परतफेड

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.१२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ अदत्त शिल्लक रकमेची १२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत देय असलेल्या व्याजासह १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुट्टी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर १३ नोव्हेंबर, २०२५ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४ (३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाद्वारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील. तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.१२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली, असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केले जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे.

रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोक ऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणाऱ्या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाद्वारे त्याचे प्रदान करील असे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्रात नमूद केले आहे.

# कळव्यात क्लस्टर नको रहिवाशांनी लावले इमारतीवर बॅनर






**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील झोपड्या, चाळी आणि बेकायदा धोकादायक इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्यासाठी समूह पुनर्विकास योजना (क्लस्टर) राबविण्यात येणार आहे. ठाण्यातील धोकादायक बेकायदा बांधकामांमध्ये जीव मुठीत धरून राहाणाऱ्या लाखो ठाणेकरांना हक्काचे घर मिळावे, यासाठी ही योजना राबविण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या योजनेत सहभागी होण्यास अधिकृत इमारतीमधील रहिवाशांकडून विरोध होत असतानाच, आता ठाणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर कळव्यातील रहिवाशांनी क्लस्टर नको असे बॅनर इमारतीवर लावले आहेत.

ठाणे शहरात मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारती पावसाळ्यात कोसळून जीवितहानी होते. अशा घटना टाळण्यासाठी अनधिकृत आणि अधिकृत इमारतींचा सुनियोजित तसेच संपूर्ण नागरी पायाभूत सुविधांसह पुनर्विकास करण्यासाठी क्लस्टर योजना राबविण्यात येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा महत्वकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी ४५ नागरी पुनरुत्थान 'आराखडे ठाणे महापालिकेने तयार केले होते. त्याचे एकूण क्षेत्रफळ १५०० हेक्टर आहे. पहिल्या टप्प्यात किसननगर भागात सिडकोच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात येत असून याठिकाणी प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून नागरिकांना हक्काची आणि मालकी घरे मिळणार आहे.

**रहिवाशांचा सातत्याने विरोध !**

क्लस्टर योजनेस मानपाडा भागातील झोपडपट्टी वासीयांनी यापूर्वी विरोध केला होता. घरावरील सर्व्हे क्रमांक पुसून टाकले होते. तसेच अधिकृत इमारतधारकांकडून योजनेस विरोध होत आहे. म्हाडातील रहिवाशांनी प्रकल्पास विरोध केला होता. ठाणे शहरातील भीमनगर, पवारनगर आणि विवेकानंदनगर या परिसरात म्हाडाच्या मालकीची जमीन मोठ्या प्रमाणात आहे. या जमिनीवर 'म्हाडा'ने बैठ्या तसेच इमारतींच्या माध्यमातून वसाहती उभ्या केल्या आहेत. त्यात हजारो नागरिक वास्तव्य करीत आहेत. ठाणे महापालिकेने तयार केलेल्या ४९ नागरी पुनरुत्थान आराखड्यांमध्ये या भागांचाही समावेश आहे. परंतु येथील जागा 'म्हाडाच्या मालकीची असल्यामुळे पालिकेला या ठिकाणी क्लस्टर योजना राबविणे शक्य होणार नाही. त्यामुळे पालिकेने येथील १९.९७ हेक्टर (४९.३५ एकर) इतकी जागा भाडेतत्त्वावर देण्याकरिता 'म्हाडा'कडे ना हरकत पत्र मागितले. त्यास म्हाडा रहिवाशांनी आंदोलन करत विरोध केला होता.

# डॉ.जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** गणित आणि विज्ञान विषयातील प्रत्येक विद्यार्थ्याचे पायाभूत ज्ञान दृढ करण्यावर शासनाने भर दिला आहे. या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनामार्फत 'डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम' राबविण्यासाठी खान अकॅडमीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन आणि कुतूहल यांचा वारसा विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारे प्रख्यात वैज्ञानिक डॉ.जयंत नारळीकर यांच्या सन्मानार्थ हा उपक्रम राबविला जात असून सुमारे ५० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल.

या कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यातील सुमारे ६२ हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी खान अकॅडमीची जागतिक दर्जाची आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रमाशी संलग्न असणारी गणित आणि विज्ञान विषयक शैक्षणिक सामग्री (डिजिटल कंटेंट) अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल. ही शैक्षणिक सामग्री मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध असणार आहे. यातील व्हीडिओ वापरून शिक्षक वर्गामधील अध्यापन अधिक समृद्ध करू शकतील तसेच विद्यार्थ्यांना व्हिडिओ-आधारित धडे आणि सराव प्रश्नांच्या माध्यमातून शाळेत व घरच्या घरी संकल्पनात्मक आकलन दृढ करण्याची संधी मिळेल. या भागीदारीचा भाग म्हणून, खान अकॅडमी इयत्ता सहावी ते दहावीसाठी असणारी विज्ञान विषयक शैक्षणिक सामग्री आता इंग्रजी आणि मराठी भाषेत तसेच महाराष्ट्र राज्य मंडळाशी संलग्न स्वरूपात उपलब्ध करून देणार आहे. याशिवाय, राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मराठी व इंग्रजी भाषेत शिष्यवृत्ती तयारी अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आला आहे. डिजिटल संसाधने वापरून अध्यापन प्रभावी करता यावे आणि विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षणाचा अनुभव देता यावा या उद्देशाने राज्यातील सर्व शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अध्यापन सहायक "Khanmigo' मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# गायमुख घाट रस्ते दुरुस्तीसाठी अवजड वाहनांना घोडबंदर मार्गावर बंदी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, ठाणे :** घोडबंदर येथील गायमुख घाट रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मिरा भाईंदर महापालिकेकडून सुरु आहे. या दुरुस्ती दरम्यान अवजड वाहनांना घोडबंदर भागात प्रवेशबंदी लागू करण्यात आली आहे. हे वाहतुक बदल रविवारी सकाळी ११ वाजेपासून सुरु झाले असून १४ ऑक्टोबर रात्री १२ वाजेपर्यंत लागू असतील. या वाहतुक बदलामुळे मुंबई नाशिक महामार्ग, भिवंडी- कशेळी भागातील वाहतुक व्यवस्थेवर ताण येण्याची शक्यता आहे.

मुंबई, ठाणे येथून घोडबंदरच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या जड अवजड वाहनांना वाय जंक्शन आणि कापूरबावडी येथे प्रवेशबंदी असेल. येथील वाहने नाशिक मार्गे खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजुरफाटा मार्गे किंवा कापूरबावडी, कशेळी येथून वाहतुक करतील.

मुंब्रा बाह्यवळण, कळवा येथून घोडबंदरच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या जड-अवजड वाहनांना खारेगाव टोलनाका येथे प्रवेशबंदी असेल. येथील वाहने खारेगाव खाडी पूल, मानकोली,

अंजुरफाटा मार्गे वाहतुक करतील. नाशिक येथून घोडबंदरच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना मानकोली नाका येथे प्रवेशबंदी असेल. येथील वाहने मानकोली पूलाखालून वळण घेत अंजुरफाटा मार्गे वाहतुक करतील. तसेच, गुजरात येथून घोडबंदरच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना गायमुख नाका येथे सकाळी ६ ते ११ आणि सायंकाळी ५ ते रात्री ११ पर्यंत प्रवेशबंदी असेल. येथील वाहने चिंचोटी नाका येथून कामण, अंजुर फाटा, मानकोली, भिवंडी मार्गे वाहतुक करतील. हे सर्व वाहतुक बदल रविवारी सकाळी ११ वाजेपासून सुरु झाले असून १४ ऑक्टोबर रात्री १२ पर्यंत कायम असतील.

## संपादकीय

### शालेय शिक्षणाला बळ

केंद्र सरकारने देशात ५७ नवीन केंद्रीय विद्यालयांची घोषणा केली. मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातही ही विद्यालये उभारली जातील. राष्ट्रीय स्तरावरील शालेय, उच्च, तंत्रशिक्षणातील संस्थांचे जाळे निर्माण झाल्यास सामाजिक, आर्थिक निर्देशांकांमध्ये मागे राहिलेला जिल्हा ही धाराशिवची ओळख निश्चित पुसली जाईल. खरे तर मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांना अशा संस्थांची उभारणी महत्त्वाची ठरेल.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळांच्या (सीबीएसई) शाळांची संख्या सर्वत्र वाढते आहे. मात्र, सरकारी स्तरावरील राष्ट्रीय शाळांची संख्या मर्यादित आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत हे प्रमाण नगण्य आहे. अनेक जिल्ह्यात क्षमता असूनही केंद्रीय विद्यालयांच्या स्थापनेकडे होणारे दुर्लक्षही राज्य व केंद्र सरकारने विचारात घेण्याची गरज आहे. त्यातच सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या ५७ केंद्रीय विद्यालयांच्या यादीत धाराशिव जिल्ह्यातील शाळेचा समावेश आहे.

मराठवाड्यात अनेक उच्च दर्जाच्या शिक्षण संस्थांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. परंतु, त्याच वेळी राष्ट्रीय स्तरावरील संस्थांचे प्रमाण वाढले तर येथील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक ते विद्यापीठीय शिक्षणात अधिकाधिक संधी निर्माण होतील. दर्जेदार शिक्षणाला अधिक प्रोत्साहन मिळेल. 'सीबीएसई' खासगी शाळांचे शुल्क सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. अशावेळी शासकीय केंद्रीय विद्यालय उभारले तर निश्चित तेथील सर्वसामान्य, गरजू विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळेल.

लातूरला 'आयआयएम', 'आयआयटी'सह केंद्रीय विद्यापीठासाठी लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा सुरू आहे. तर, धाराशिवला केंद्रीय विद्यालय स्थापण्यास केंद्र सरकारने सकारात्मकता दर्शविली आहे. धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी त्यासाठीचा पाठपुरावा केला. सरकारने सकारात्मकता दर्शविली तरी स्थानिक स्तरावर प्रशासनाने पुढील कार्यवाही तातडीने सुरू करण्याची गरज आहे. शैक्षणिक वर्षापासून विद्यालय कार्यान्वित झाल्यास अनेक विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील संस्थेत शिक्षणाची संधी उपलब्ध होईल. आवश्यक त्या पायाभूत सुविधा, विद्यालयासाठी लागणारी जमीन याबाबतही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी पावले उचलली गेली पाहिजेत.

प्रशासनाने धाराशिव तालुक्यातील राघूचीवाडी येथील जागा केंद्रीय विद्यालयासाठी नियोजित केली आहे. अंतिम मोजणी करूनही झाली आहे. आता या ठिकाणी लवकरात लवकर पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. धाराशिव जिल्ह्यात 'नागरी क्षेत्र'शी निगडित असलेली शाळा असणार आहे. केंद्रीय विद्यालयांमध्ये 'नागरी', 'संरक्षण', 'उच्च शिक्षण' सेक्टरसाठीच्या शाळा आहेत. देशभरात आजघडीला केंद्रीय विद्यालयांच्या शाळांची संख्या १२८८ एवढी आहे. यात मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, पूर्णा अशा ठिकाणी केंद्रीय विद्यालये आहेत. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूरसह अन्य शहरांचा विचार केला तरी केंद्रीय विद्यालयांची संख्या वाढू शकते.

धाराशिव जिल्हा 'आकांक्षित जिल्ह्यां'च्या यादीत आहे. सामाजिक, आर्थिक निर्देशांकांमध्ये मागे असलेला जिल्हा म्हणूनही त्याची ओळख आहे. अशा वेळी कृषी, शिक्षण, आरोग्य, उद्योग अशा क्षेत्रांकडे सजगतेने पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण अधिकाधिक दर्जेदार कसे देता येईल, यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. धाराशिवला लागून असलेल्या लातूर जिल्ह्याने शिक्षणाच्या बाबतीत आपला वेगळा ठसा निर्माण केला. शिक्षणात 'लातूर पॅटर्न'ची ओळख आहे. त्यामुळे अशा संस्थांची उभारणी अधिक प्रभावी ठरेल. धाराशिव ब्रॉडगेज रेल्वेमार्गाने जोडले गेले आहे.

जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांची संख्या मोठी आहे. दळणवळणाच्या सुविधा पाहता शैक्षणिक विकास आणि पायाभूत सुविधांची उपलब्धता याच्या जोरावर शालेय शिक्षणाला बळकटी देण्यासाठी राज्य, केंद्र सरकारकडून अधिक मदतीची अपेक्षा आहे. केंद्रीय विद्यालयांची संख्या मराठवाड्यात कमी आहे. ती वाढली तर शिक्षणाला बळकटी मिळेल.

### विरक्त...

शुध्द माणूस हरवला
कसा बने भेसळयुक्त
डिग्री गळ्यात मिरवी
ज्ञानकुंभ संपूर्ण रिक्त

ओसरत चालले पुण्य
खजिने भरतोयं फक्त
दुष्कृत्या मार्ग मोकळे
दाही दिशा मिळे मुक्त

निर्भेळवर्तन विसरला
नासलेधमन्यातलेरक्त
पायाखाली चेपा सर्वां
सर्वोत्तम केवळ तख्त

अतिहव्यास नडे अंति
रे बनवले राक्षस भक्त
शर्यतअशा जिवघेण्या
कान पिळी बळी शक्त

काना तोंडा भरा बोळे
कोण कसा होई व्यक्त
कसा सांभाळे विश्वास
स्वता लुटतात विश्वस्त

पळवाटा सहज सोप्या
कायदा नाम मात्र सक्त
विरोध मावळला पूर्वेस
सामान्य माणूस विरक्त

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## बघा, पटतंय का?



**-किशोर जाधव**
**सोलापूर**
**मो.९९२२८८२५४१**

एखाद्याला समजावणं किंवा शिकवणं हे खरंच अवघड काम आहे. विद्वान पंडित, साधुसंत आणि लोकप्रिय नेते यांचं लोक ऐकून घेतात. त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालण्यास लोक तयार होतात. साधुसंतांचे ऐकणाऱ्यांचा पुढे जाऊन एक पंथ तयार होतो. या सर्वांचे विचार कृतीत आणणाऱ्यांना आपण 'अनुयायी' म्हणतो.

प्रत्येकाची एक विशिष्ट वैचारिक बैठक ठरलेली असते. महात्मा गौतम बुद्ध, भगवान महावीर, महात्मा गांधी यांनी अहिंसा, सत्य आणि सेवाभावाची शिकवण दिली. चाणक्याने व्यवहारज्ञान दिलं. संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकारामांपर्यंत अनेक संतांनी महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय निर्माण केला आणि लोकांना भक्तीभाव शिकवला.

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रात वैचारिक प्रबोधन घडवले. अनिष्ट प्रथा आणि परंपरांमध्ये अडकलेल्या लोकांना मानवतेची शिकवण दिली. अनेक विचारवंतांनी नैतिक मूल्यं, सदाचार आणि जीवनसत्याची मांडणी नेमकेपणाने व स्पष्टपणे केली. लेखकांनी लेखन केलं, व्याख्याते व्याख्यानं दिली, कीर्तनकारांनी कीर्तनं केली, नाटककारांनी नाटके सादर केली.

पूर्वी पटवून सांगण्याचं काम कुटुंबामध्ये वडीलधारी मंडळी करत असत. आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीत आणि समाजमाध्यमांच्या भरभराटीच्या काळात एकमेकांशी समोरासमोर संवाद साधणं कठीण झालं आहे. त्यामुळे लोकांचं मानसिक आरोग्य बिघडलेलं आहे, आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे, संघर्ष आणि द्वेषभावना वाढत आहेत.

अशा काळात 'पटवून सांगणं' हे काम समजदार लोकांनी हताश न होता करायला हवं. जो दगड मूर्तिकाराच्या छिन्नी-हातोड्याचे घाव सहन करतो, त्याचाच सुंदर असा मूर्तीमध्ये रूपांतर होतं. पण जो दगड हे घाव सहन करायला तयार नसतो, त्याचाच तुकडा नंतर मूर्तीसमोर ठेवला जातो ˉ जिथे लोक नारळ फोडतात!

मूर्ती बनलेला दगड थोडक्यात 'पटवून घेतो', पण पायरीचा दगड मात्र बदल स्वीकारायला तयार नसतो.

मानवी उत्क्रांतीच्या प्रवासात ˉ जेव्हा कुटुंबव्यवस्था आणि पुढे समाजव्यवस्था निर्माण झाली, तेव्हापासून माणूस एकमेकांच्या मदतीने, आधाराने जगू लागला. शेती करून उदरनिर्वाह करण्याची कल्पना सुचली, तेव्हा त्याला लक्षात आलं की शेती करणं हे एकट्याचं काम नाही. बैल, घोडे, उंट अशा प्राण्यांसोबत सुतार, लोहार, कुंभार, सोनार यांसारख्या विविध कौशल्यांच्या लोकांना सोबत घेतल्यास काम अधिक सोपं होतं.


यातून 'आलूते-बलुते' व्यवस्था निर्माण झाली. ही व्यवस्था आत्मनिर्भर बनवणारी, सहकार्य आणि सेवाभाव वाढवणारी, तसेच समाज घडवणारी होती.अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या. पुढे शिक्षण, आरोग्य, दळणवळणाच्या सुविधा आणि सांस्कृतिक भूक भागवण्याचं स्वातंत्र्य या गरजा वाढत गेल्या. पर्यटन, क्रीडा, कौशल्य, संपत्ती या गोष्टींची यादीही वाढली.

माणूस आपल्या गरजांचं वर्तुळ वाढवत गेला आणि त्यामुळे त्या एकमेकांना छेद देऊ लागल्या.यातून संघर्ष निर्माण झाले. सत्ता, संपत्ती आणि स्त्री-अभिलाषा यांमुळे मोठमोठे नरसंहार झाले. धार्मिक वांशिक संघर्षात माणूस आपलं माणूसपण विसरला. संतुलन बिघडलं आणि तो खोडसाळपणे वागू लागला. तोंडावर ताबा न राहिल्याने बडबड करून समोरच्याचं मन दुखवू लागला. दुसऱ्याच्या जीवनात ढवळाढवळ करू लागलो. आपल्याला वाटू लागलं की दुसऱ्याने आपल्या मनासारखंच वागावं. धाकधपटशाहीने दुसऱ्याचं स्वातंत्र्य हिरावून घेणं ˉ हे मुळीच मानवीय नाही.

प्रत्येकाला त्याच्या स्वभावाप्रमाणे जगण्याची मुभा दिली पाहिजे. त्याचबरोबर जसं रस्त्यावर विविध वाहतूक नियमांचे फलक असतात, तसेच जीवनरूपी मार्गावरही समजावून सांगणाऱ्या गोष्टी सांगितल्या जातात . त्या लक्षात घेतल्या, आणि बघा, पटतंय का? असं सांगणाऱ्याचं ऐकून जे पटेल ते आचरणात आणलं ˉ तर आपण नक्कीच सुखी बनू शकतो. पटवून सांगण्याचं काम संत तुकाराम महाराजांच्या पुढील अभंगाची प्रेरणा घेऊन माझ्यासारख्या अनेकांनी केलं पाहिजे..

**काय करू आता धरुनिया भीड ।**
**नि:शंक हे तोंड वाजविले ।।**
**नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण ।**
**सार्थक लाजोनी नव्हे हित ।।**
**आले ते उत्तर बोले स्वामीसवे ।**
**धीट नीट जीवे होऊनिया ।।**
**तुका म्हणे मना समर्थासी गाठी ।**
**घालावी हे मांडी थोपटुनि ।।**

## चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार



हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या.

त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला.

किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे.

राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या.

असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## दीपावलीच्या तेजाला फटाक्यांची काजळी !



गेल्या काही वर्षांपासून दिवाळीनिमित्त एवढ्या प्रचंड प्रमाणात फटाके फोडले जातात कि फटाके हीच दिवाळीची खरी ओळख आहे की काय असा प्रश्न पडतो. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, यमद्वितीया म्हणजेच भाऊबीज अशी सहा दिवसांची दिवाळी. या प्रत्येक दिवसाचे वेगळे महत्व आहे. त्या प्रत्येक दिवसाला वेगळा इतिहास आहे आणि त्या दिवशीचा सण कसा साजरा करावा यामागील शास्त्रही ठरलेले आहे. अर्थात राज्यपरत्वे, स्थानपरत्वे या सणांच्या मागील वेगवेगळ्या कथा आणि इतिहास ऐकायला मिळतात. मात्र संपूर्ण भारतभरात उत्साहाने साजरी होणाऱ्या दिवाळीतील सामायिक बाब म्हणजे या दिवसांत सर्वत्र मोठ्या प्रमाणात दिवे लावले जातात. दीपावली शब्दाचाच अर्थ दीप +आवली अर्थात दिव्यांची रांग असा आहे. दीपावली हा दिव्यांचा उत्सव आहे. तिमिराकडून तेजाकडे म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेण्याची शिकवण दीप आपल्याला देतो. कोणी कितीही गरीब असला तरी त्याच्या घरी दिवाळी दरवर्षी साजरी होतेच. दिवाळीच्या निमित्ताने घर आणि सभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो, घराला रंगरंगोटी केली जाते, या सहा दिवसांत दाराबाहेर आकाशकंदील लावला जातो. दाराजवळ सुबक रांगोळी काढली जाते. दारात आणि तुळशीजवळ तेलाच्या पणत्या लावल्या जातात. घरोघरी लाडू, चकली कारंज्यांचा फराळ बनवला जातो. आप्तेष्टांना, मित्र मंडळींना दिवाळीच्या आणि पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या जातात. हीच दिवाळी साजरी करण्याची परंपरागत पद्धत. या सर्वांत फटाके वाजवणे कुठेच बसत नाही, मग ही प्रथा दिवाळीत शिरली तरी कुठून ? एरव्ही लग्न समारंभ, उदघाटनाच्या कार्यक्रमांत, मिरवणुकांमध्ये आणि राजकीय सभांच्या वेळी आतषबाजी म्हणून फटाके फोडणे एकवेळ मान्य; मात्र दिवाळीसारख्या धार्मिक सणाचा आणि फटाके फोडण्याचा काय संबंध ?

सुमारे २२०० वर्षांपूर्वी चीनच्या लुईयाँग प्रांतात फटाके फोडल्याचा संदर्भ आढळतो. आगपेटीच्या काडीप्रमाणे काठ्यांच्या टोकाला ज्वालाग्राही पदार्थाची गाठ बनवली जाई आणि ही गाठ आगीत धरल्यावर तिचा आवाज येत असे. ही आतषबाजी पुढे लग्नसमारंभांना होऊ लागली. १९२३ मध्ये भारतातील कोलकात्यामध्ये नाडर बंधूंनी आगपेटीच्या कारखान्यांमध्ये सर्वप्रथम फटाक्यांची निर्मिती केली. १९४० मध्ये तामिळनाडूतील शिवकाशी येथे फटाक्यांचा पहिला कारखाना सुरु झाला. तेव्हापासून आजतागायत शिवकाशी मध्ये अविरतपणे फटाक्यांची निर्मिती सुरु आहे. आजमितीला शिवकाशी येथे फटाक्यांचे मोठमोठे कारखाने तयार झाले आहेत. येथून संपूर्ण भारतात फटाके पुरवले जातात. शिवकाशी येथे तयार केल्या जाणाऱ्या फटाक्यांना भारतभरातून विशेष मागणी आहे. दिवाळी सणाला सहस्रो वर्षांचा इतिहास आहे आणि फटाके बनवणारा पहिला कारखाना भारतात ८३ वर्षांपूर्वी तयार झाला आहे याचाच अर्थ दिवाळीत फटाके फोडण्याच्या प्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नाही. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी आतषबाजी करत असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. ही आतषबाजी आता फटाक्यांच्या रूपाने दिवाळीत सर्वत्र होऊ लागली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या किंवा सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांत आतषबाजी करण्याची प्रथा पाश्चात्य देशांमध्ये सुद्धा आहे, मात्र ही आतषबाजी केवळ शोभेच्या फटाक्यांपुरती सीमित असते. आपल्याकडे मात्र शोभेपेक्षा अधिकाधिक आवाजाच्या फटाक्यांचीच स्पर्धा प्रतिवर्षी पाहायला मिळते.

दिवाळीच्या तोंडावर दरवर्षी प्रशासनाकडून फटाके फोडण्यासंदर्भातील नियमावली जाहीर केली जाते ज्यामध्ये आवाजाच्या मर्यादेपासून फटाके फोडण्यासाठीची निषध्द क्षेत्रेही नमूद केलेली असतात. मात्र शहरासारख्या ठिकाणी या नियमावलीला सर्रासपणे हरताळ फासला जातो. सर्वत्रच फटाक्यांची आतषबाजी सुरु असल्याने कारवाई तरी कोणावर करणार, असा यक्ष प्रश्न प्रशासनासमोर असतो. आजमितीला लोकसंख्येत अव्वल असलेल्या भारतातील बराचसा भाग दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठत आहे, ज्यांना दोन वेळेचे पोटभर अन्न मिळणेही दुरापास्त आहे. देशातील कित्येक गावे कुपोषित आहेत. दिवसागणिक वाढत जाणाऱ्या महागाईने सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल केले आहे. अशा परिस्थितीत केवळ क्षणिक मौजेखातर फटाक्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची राख-रांगोळी करणे कितपत योग्य आहे ? शिवकाशी हे ठिकाण अव्वल दर्जाचे फटाके बनविण्यासाठी देशभर प्रसिद्ध आहे; मात्र याच शिवकाशीमध्ये दरवर्षी फटाक्यांच्या कारखान्यांना आगी लागून जीवित आणि वित्तहानी होण्याच्या अनेक घटना घडत असतात. या कारखान्यांतील दारूच्या प्रभावामुळे कारखान्यांत काम करणाऱ्या कितीतरी लहान मुलांना, कामगारांना असाध्य आजार जडतात, कायमचे अपंगत्व येते. याशिवाय दिवाळीच्या दरम्यान फटाक्यांच्या गोदामांना, दुकानांना आगी लागल्याच्या अनेक बातम्या दरवर्षी वाचनात येतात. फटाके फोडताना कित्येक जण भाजतात, जळके फटाके इतरत्र उडाल्यामुळे आगी लागण्याच्या घटना घडतात ज्यामध्ये दरवर्षी शेकडो जण मृत्युमुखी पडतात तर हजारो जण जखमी होतात. याकाळात अग्निशमन दलावर प्रचंड ताण असतो. याशिवाय केवळ फटाक्यांच्या कारणावरून अनेक ठिकाणी भांडणे, मारामाऱ्या होतात त्या वेगळ्या.

कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे इमारतींना तडे जातात, खिडक्यांच्या काचा फुटतात तसेच सिलींगचे प्लास्टरिंग सैल होण्याचाही धोका असतो. विजेचे काचेचे बल्बही फटाक्यांच्या आवाजामुळे फुटतात. दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे लोकांच्या आरोग्यावर सर्वाधिक परिणाम होतो. कानठळ्या बसवणार्या फटाक्यांमुळे कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. अतिआवाजामुळे कान बधीर होतात. श्रवणयंत्रणातील पेशी एकदा मृत झाल्या की, त्या पुन्हा नव्याने निर्माण होत नाहीत. गर्भवती महिला, दीर्घ आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण आणि नवजात बालके यांच्यावर फटाक्यांच्या आवाजाचा भयंकर परिणाम होतो. मायग्रेन, रक्तदाब आणि हृदयविकाराचा त्रास असणाऱ्या रुग्णांच्या त्रासामध्ये फटाक्यांच्या अतिआवाजामुळे अधिक वाढ होण्याची शक्यता असते. फटाके फोडल्यावर निर्माण होणाऱ्या विषारी धुरामुळे प्रचंड वायुप्रदूषण होते ज्याचा त्रास लहान मुलांसह अस्थमा आणि फुफुसाचा आजार असलेल्यांना अधिक होत असतो. अमेरिकेसारख्या विकसित देशात मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्यात आली आहे. न्यूझीलंड, इटली, फ्रान्स, बेल्जियम या देशांत केवळ प्रौढ व्यक्तींनाच फटाके विकत घेण्यास आणि फोडण्यास अनुमती आहे. आपल्याकडे मात्र असे कोणतेही धोरण प्रशासनाने आखलेले नाही. उलट इथे घरातील प्रौढच फटाके आणून ती लहानांना फोडण्यासाठी उपलब्ध करून देतात.

दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराघरात श्री महालक्ष्मी आणि श्री कुबेराचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही धनाची देवता आहे तर कुबेर हा धनसंचयाचा देव आहे. एकीकडे योग्य मार्गाने धन प्राप्ती होण्यासाठी देवी लक्ष्मीची आणि आलेले धन टिकून राहावे यासाठी कुबेराची पूजा करायची आणि दुसरीकडे लक्ष्मीच्या कृपेने मिळालेले धन फटाक्यांच्या माध्यमातून विनाकारण व्यय करायचे हा विरोधाभास नव्हे काय ? प्राचीन युगात राक्षस नागरिकांना त्रास देऊन असुरी आनंद मिळवायचे. आताच्या काळी फटाके फोडून इतरांना त्रास देऊन साजरा केल्या जाणाऱ्या आनंदाला असुरी आनंदच म्हणावे लागेल. आपल्याला एखादा आजार झाला कि त्यावर वेळीच उपचार घेऊन आपण त्याचे निराकरण करतो. फटाक्यांच्या रूपाने आपल्या हिंदू संस्कृतीतील दीपावली सारख्या व्यापक आणि सात्विक सणाला एकप्रकारचा आजारच जडला आहे. तो दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दीपावलीच्या तेजाला लागलेली फटाक्यांची काजळी दूर करून तिला पुनर्रतेज प्राप्त करून द्यायचे असेल, तर सुरुवात आपल्या घरापासूनच करावी लागेल.

**- जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२




# छत्रपती शिवरायांना मानवंदना देत 'दुर्गोत्सव'

## या उपक्रमात सहभागी होण्याचे महाराष्ट्र शासनाचे नागरिकांना आवाहन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, नवी मुंबई :** युनोस्कोने नुकतेच जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये छत्रपती शिवरायांचे बारा दुर्ग समाविष्ट केले आहेत. हा सर्वांसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा विषय असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेनुसार 'दुर्गोत्सव' हा अभिनव उपक्रम साजरा करण्याचे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

दीपावली आणि फराळ, रांगोळी याप्रमाणेच या उत्सवात मिळेल त्या जागेत लहानथोरांनी मिळून दुर्गांच्या प्रतिकृती बनविण्याची आपली सांस्कृतिक परंपरा आहे. या माध्यमातून इतिहासाला उजाळा मिळतोच, तसेच पुढच्या पिढीच्या मनात आपल्या वैभवशाली वारशाच्या अभिमानाची रूजवात होते. हा शिवछत्रपतींना मानवंदना देणारा दीपावली कालावधीत स्वयंस्फुर्तीने साजरा होणारा दुर्गोत्सवाचा उपक्रम अत्यंत वैशिष्टयपूर्ण असून जगात कुठेही अशा स्वरूपाचा उपक्रम साजरा केला जात नाही. त्या अनुषंगाने सर्व नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे की, नागरिकांनी आपल्या अंगणात, घरासमोरील जागेत, सोसायटीच्या आवारात, बागेमध्ये अथवा बाल्कनीत युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केलेल्या रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, पद्मदुर्ग अशा १२ दुर्गांच्या हुबेहुब प्रतिकृती उत्तम सजावटीसह आपल्या कुटुंबातील – परिवारातील सर्वांनी एकत्र येऊन बनवाव्यात.

या दुर्गोत्सवात सहभागी होण्याकरिता दि. १२ ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत https://www.durgotsav.com/ या डिजीटल प्लॅटफॉर्मवर नाव व इतर तपशीलाचा फॉर्म भरून नोंदणी करावयाची आहे. त्यानंतर दुर्गोत्सवाच्या अनुषंगाने आपण बनविलेल्या १२ पैकी एका दुर्गासोबतचे सेल्फी छायाचित्र काढून ते https://www.durgotsav.com/ याच डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड करावयाचे आहे. या छायाचित्राची अमृत संस्थेमार्फत वैधता पडताळणी सिध्द झाल्यानंतर भाग घेणा-या प्रत्येकास शासनाच्या वतीने मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे 'अभिनंदन पत्र' डिजीटल स्वरूपात प्रदान केले जाणार आहे. त्याचप्रमाणे 'शिवचरित्रातून आज घ्यावयाचे धडे' या विषयावरील उत्कृष्ट असे ऑडिओ आणि व्हिडीओ स्वरूपातील गोष्टीचे संकलनही नि:शुल्क उपलब्ध होणार आहे.

कोणत्याही उपक्रमात अग्रेसर असणा-या नवी मुंबईकर नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आपल्या मनात असलेला अभिमान अभिव्यक्त करण्यासाठी तसेच दीपावली सणात दुर्गांच्या प्रतिकृती बनविण्याची आपली सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी दुर्गोत्सव उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# हाळखुर्द गावातील १२० वर्ष जुनी उर्दू शाळेचे नूतनीकरण

## आ.थोरवे यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा संपन्न





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२ :** खालापूर तालुक्यातील हाळखुर्द गावात १२० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळेच्या नव्या इमारतीचे लोकार्पण आमदार महेंद्र थोरवे यांच्या शुभहस्ते शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झाले. आमदार महेंद्र थोरवे यांच्या विशेष प्रयत्नातून जिल्हा परिषद सेस योजनेअंतर्गत ७६ लाख २० हजार रुपयांचा निधी मंजूर झाल्यामुळे या ऐतिहासिक शाळेला नवसंजीवनी लाभली आहे.मुंबई – पुणे जुन्या महामार्गालगत असलेल्या हाळखुर्द गावातील जुनी शाळा जीर्ण अवस्थेत असल्याने तिच्या नूतनीकरणाची गरज तीव्र होती. सामाजिक कार्यकर्ते हुसेन खान, ग्रामपंचायत उपसरपंच अजीम मांडलेकर आणि ग्रामस्थांनी या शाळेच्या पुनर्बांधणीसाठी आमदार थोरवे यांच्याकडे मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे ही मागणी प्रत्यक्षात उतरली आणि आज गावातील मुलांना नव्या, प्रशस्त आणि सुसज्ज इमारतीत शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे.शाळेच्या नव्या दुमजली इमारतीत एकूण ६ वर्गखोल्या आणि इतर शैक्षणिक सुविधा अत्याधुनिक पद्धतीने तयार करण्यात आल्या आहेत. लोकार्पणाच्या वेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता, तर शाळकरी विद्यार्थिनींनी आमदार थोरवे यांचे फुलांच्या वर्षावातून स्वागत केले.

या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, मतदारसंघातील सर्व समाजघटकांना एकत्र घेऊन शाश्वत विकासाची वाटचाल सुरू आहे. पहिल्या टप्प्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे पूर्ण केली असून, दुसऱ्या टप्प्यात प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्याचा मानस आहे. हाळखुर्द येथील शाळेचे नूतनीकरण हे केवळ एक बांधकाम नाही, तर भावी पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली गुंतवणूक आहे. नव्या इमारतीतून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे सुसज्ज वातावरणात घेता येणार आहेत, हीच खरी आनंदाची बाब आहे. तसेच शाळेच्या बांधकामासाठी आपली मालकी हक्कातील जागा दान करणारे मरहूम हसनमिया शेख इद्रीस करंजीकर यांचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रम प्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख संदेश पाटील, युवासेना विधानसभा अधिकारी रोहित विचारे, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, माजी नगरसेवक मोहन अवसरमल, दिनेश थोरवे, हुसेन खान, हमीद अन्सारी, नदीम खान, रफिक जळगावकर, फैय्याज दुदुके, चंदन भारती, विष्णू ठोंबरे, महेश आगिवले, अतुल देशमुख, नरेश रसाळ, राकेश सुखदरे, सुलेमान खान, सरपंच शबनम मुल्ला, उपसरपंच अजीम मांडलेकर, सदस्य आसिफ बेडेकर, सदस्य कमली वाघमारे, सदस्य प्रभास क्षीरसागर, हनीफ मुल्ला, हुसेन जळगावकर, अकबर जळगावकर, अल्ताफ जळगावकर, माजी सरपंच शैला क्षीरसागर, चंदर वाघमारे, मंगेश क्षीरसागर, सचिन क्षीरसागर, रवी पवार, प्रशांत जाधव, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे''
दुरध्वनी. ०२१४३-२९९२२१
Email-rfopenpro@rediffmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वनिवभाग
वनपरिक्षेत्र अधिकारी पेण यांचे कार्यालय
तहसिल कंपाउंड मु.ता. पेण जि. रायगड पिन -४०२१०७

**जाहिर निविदा सुचना**

मा. उप वनसंरक्षक, अलिबाग वन परिक्षेत्र कार्यालय पेण अंतर्गत एकात्मीक आदीवासी विकास प्रकल्प/राज्य योजना/ जिल्हा वार्षीक योजने / निसर्ग संरक्षण व वन्यपशु व्यवस्थापन (वन्यपशु व निसर्ग संरक्षण योजना) मधुन गॅबीयन बंधारे, वनतलाव व इतर कामे करण्याकरीता प्रशासकीय मंजुरीचे अधिन राहुन निवीदा सुचनेची जाहीरात या सोबत पाठविण्यात येत आहे. तरी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनीक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण, जिल्हा परीषद व जलसंपदा विभाग या विभागाकडे वर्ग १ ते ७ वर्गातील पंजीकृत कंत्राटदाराकडून खालील नमुद अटी शर्तीच्या अधीन राहून दिलेल्या प्रपत्रांत सिलबंद लिफाफयामध्ये निवीदा मागवीण्यात येत आहेत. संबंधीत कामाबाबतचे निवीदा फॉर्म व अटी शर्ती प्रती काम निहाय रुपये १००/- रोखीने भरणा केल्यास दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत वनपरिक्षेत्र अधिकारी, पेण यांचे कार्यालय पेण ता. पेण, जि. रायगड येथे उपलब्ध होईल.

| | |
|---|---|
| निवीदा प्रकाशित करावयाची तारीख | दि. १३/१०/२०२५ |
| निवीदा फॉर्म व अटी शर्ती मिळण्याची तारीख व वेळ (शासकीय सुटटीचे दिवस वगळुन) | दि. १३/१० /२०२५ ते दि. २८/१० / २०२५ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा भरण्याची अंतीम तारीख | दि. २८/१०/२०२५ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा उघडण्याची तारीख | दि. ३०/१० / २०२५ (सोईनुसार)<br>ठिकाण : सहा. वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), अलिबाग यांचे कार्यालय |

**कामाचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे - वन परिक्षेत्र पेण, तालुका - पेण, जि. रायगड**

| अ.क्र. | कामाचे नाव | ठिकाण | क.नं / स.नं | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध १,२,३,४,५ | सवणे | ११९ | ७५४०८५ |
| २. | गॅबीयन बंधारा नाला नं २ बांध ६,७,८,९ | सवणे | ११९ | ६०६२२६ |
| ३. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध १,२,३,४ | कोरळ | २४ | ४४३५८० |
| ४. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध १,२,३,४,५,६ | घेरामाणिकगड | १२० | ७८३६५७ |
| ५. | वनतलाव | कैरा | ११८ | ३६१४५० |
| ६. | वनतलाव | कोरळ | ३२ | ३६१४५० |
| ७. | वनतलाव | कोरळ | ३३ | ३६१४५० |
| ८. | वनतलाव | सारसई | १२४ | ३६१४५० |
| ९. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध ६,७,८,९,१०,११ | आंबेघर | ४८८ | ७८३६५७ |
| १०. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध ८,९,१०,११ | पेण | ५०९ | ७५४०८५ |
| ११. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध ६,७,८,९,१० | सवणे | ११९ | ७०९७२७ |
| १२. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध १,२,३,४ | घेरामाणिकगड | १२० | ७३९२९९ |
| १३. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध १,२,३,४,५ | कोरळ | १२८ | ५४७०८२ |
| १४. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध ५,६,७,८ | घेरामाणिकगड | १२० | ७३९२९९ |
| १५. | निवासस्थान दुरुस्तीचे अंदाजपत्रक | पेण वनवसाहत | १०२९,१०३० १०३१,१०३२ | ३८५६९४ |
| १६. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध ५,६,७,८ | अधर्णे हेदोशी | ५०३ | ७९८४४३ |
| १७. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध ९,१०,११,१२ | अधर्णे हेदोशी | ५०३ | ८१३२२९ |
| १८. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध १३,१४ | अधर्णे हेदोशी | ५०३ | ३९९२२२ |
| १९. | गॅबीयन बंधारा नाला नं २ बांध ७,८,९,१०,११ | अधर्णे हेदोशी | ५०४ | ७९८४४३ |
| २०. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध १,२,३,४,५,६,७ | अधर्णे सातेरी | ५०५ | ८१३२२९ |
| २१. | गॅबीयन बंधारा नाला नं १ बांध ८,९,१०,११ | अधर्णे सातेरी | ५०५ | ७८३६५७ |
| २२. | लाडीवली नर्सरी येथे गोडाऊन सुशोभीकरण करणे | आपटा, आकुळवाडी | ३५ | ७०१०४९ |
| २३. | तळवळी नर्सरी येथे रोड बांधणे | तळवली | ५ | ८२०४३३ |
| २४. | तळवळी नर्सरी येथे लेवलींगचे काम | तळवली | ५ | ४०८३८० |
| २५. | तळवळी नर्सरी येथे गोडाऊन बांधणे | तळवली | ५ | ८३३४६८ |
| २६. | तळवळी नर्सरी येथे लेबर रूम बांधणे | तळवली | ५ | ४१८५३२ |
| २७. | वनपरिक्षेत्र कार्यालय सुशोभीकरण करणे | उंबर्डे | ५० | ८३५५०३ |
| २८. | वनपरिक्षेत्र अधिकारी निवासस्थान येथे स्टोअर रूम बांधणे | पेण वनवसाहत | १०२९,१०३० १०३१,१०३२ | ७९९१६५ |

तरी इच्छूक कंत्राटदार यांनी निविदा कालावधीं वनपरिक्षेत्र कार्यालय पेण येथे निवीदा सादर कराव्यात. अधिक माहीतीसाठी वनपरिक्षेत्र कार्यालय पेण यांचे कार्यालयाशी सुटटीच्या दिवसा खेरीज कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.


ठिकाण :- पेण

सही
(सपना निंबा सोनार)
वन परिक्षेत्र अधिकारी, पेण (संरक्षण)

# हाडांत साचलेलं युरिक ॲसिड ३० दिवसांत पडेल लघवीतून बाहेर

कधी अचानक गुडघे दुखायला लागतात, पावलांच्या सांध्यात वेदना जाणवतात किंवा सूज येते आणि काही दिवसांनी वेदना वाढतच जातात? अनेकदा लोक याकडे साध्या थकव्याचा परिणाम म्हणून पाहतात, पण ही लक्षणं शरीरातील युरिक ॲसिड वाढल्याची सुरुवात असू शकतात. जेव्हा रक्तात युरिक ॲसिडचं प्रमाण जास्त होतं, तेव्हा ते स्फटिकांच्या स्वरूपात सांध्यांमध्ये साठू लागतं आणि गाऊट, सूज, सांधेदुखी, अगदी किडनीचे आजारही निर्माण होतात.

काही वेळा औषधं आणि उपचार आवश्यक असतात, पण



आहारातील बदलांनीही मोठा फरक पडू शकतो. तज्ज्ञ सांगतात, जर रोजच्या आहारात काही विशिष्ट भाज्या समाविष्ट केल्या, तर शरीर नैसर्गिकरीत्या युरिक ॲसिड कमी करू लागतं. या भाज्या शरीरातील विषारी घटक बाहेर टाकतात, सूज कमी करतात आणि पचन सुधारतात. चला, जाणून घेऊया त्या पाच चमत्कारिक भाज्या ज्या युरिक ॲसिड नियंत्रणासाठी औषधापेक्षाही परिणामकारक ठरतात.

**काकडी : नैसर्गिक डिटॉक्स करणारी भाजी**

काकडीत जवळपास ९९% पाणी असतं, जे शरीरातून विषारी द्रव्यं बाहेर काढतं. काकडीचा थंडावा किडनीचं कार्य सुधारतो आणि सूज कमी करतो. दररोज सलाडमध्ये किंवा रस म्हणून तिचा समावेश केल्यास युरिक ॲसिड लघवीवाटे बाहेर टाकण्यास मदत होते. नियमित सेवनाने पचनक्रिया सुधारते आणि शरीर हलकं वाटतं. उन्हाळ्यात तर ही भाजी नैसर्गिक थंड औषधासारखी काम करते.

**गाजर : दाहशामक आणि शुद्ध करणारे गुणधर्म**

गाजरामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स, फायबर आणि व्हिटॅमिन ए हे घटक युरिक ॲसिड कमी करण्यात मदत करतात. गाजर शरीराचा मेटाबॉलिझम वाढवते आणि सांध्यातील सूज कमी करते. दररोज गाजराचा रस, सूप किंवा सलाड घेणं फायदेशीर ठरतं. विशेष म्हणजे, गाजरात नैसर्गिक दाहशामक गुणधर्म असल्यामुळे गाऊट आणि सांधेदुखीच्या त्रासातही आराम मिळतो. त्याचप्रमाणे टोमॅटो करणे आणि सिमला मिरची यामध्ये नैसर्गिकरित्या युरिक ॲसिड बाहेर टाकण्याची क्षमता आहे.

# दहिवलीतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत मोठ्या उत्साहात प्रवेश

## आमदार थोरवे यांच्या उपस्थितीत तरुणांची विकासासाठी एकजूट



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, दहिवली (रायगड) :** दहिवली प्रभागातील तरुणांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वावर आणि विकासाभिमुख कार्यशैलीवर विश्वास ठेवत मोठ्या उत्साहात शिवसेना पक्षात प्रवेश केला. शिवतीर्थ, पोसरी येथे आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात वरुण मुसळे, प्रतीक साळुंखे, मिलिंग कनोजिया आणि आकाश चव्हाण यांनी भगवा ध्वज स्वीकारत विकासासाठी एकजूट हा निर्धार व्यक्त केला. गावोगाव दिसणारा प्रगतीचा वेग आणि जनतेच्या चेहऱ्यावरचा समाधानाचा भाव हे आमदार थोरवे यांच्या कार्याचे जिवंत उदाहरण असल्याचं नव्याने दाखल झालेल्या कार्यकर्त्यांनी सांगितलं. मतदानापुरतं समर्थन न ठेवता प्रत्यक्ष विकासाच्या रणांगणात उतरून आमदारांचे हात बळकट करू, अशी भूमिका तरुणांनी घेतली.या प्रसंगी बोलताना तरुणांचा वाढता ओघ हे शिवसेनेच्या मजबूत पायाभरणीचे प्रतीक आहे. त्यांच्या जोशाने आणि ऊर्जेने विकासाच्या वाटचालीला नवी गती मिळेल, आणि कर्जत-खालापूर हा शिवसेनेचा अभेद्य किल्ला बनेल.दहिवली परिसरात झालेल्या या पक्षप्रवेशामुळे नवचैतन्याचं वातावरण निर्माण झालं असून, तरुणांचा असा सक्रिय सहभाग शिवसेनेला नवी दिशा आणि नवसंजीवनी देणारा ठरत आहे. याप्रसंगी याप्रसंगी उद्योजक विश्वनाथ थोरवे, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रसादजी थोरवे, कर्जत उपशहर प्रमुख दिनेश कडू, युवा सेना तालुकाप्रमुख प्रमोदजी शिर्के, विभाग प्रमुख पंकज शिंदे व शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# ५ लाखांची लाच घेताना पोलीस कर्मचारी अँटी करप्शनच्या जाळ्यात



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१२, रायगड :** रायगड पोलीस विभागाची प्रतिमा मलिन करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. पॉक्सो कायद्यांतर्गत कारवाई न करण्याच्या मोबदल्यात तब्बल ५ लाख रुपयांची लाच मागणार्या पोलिस हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. आरोपी हवालदाराने पहिल्या हप्त्यापोटी ३ लाख रुपये स्वीकारताना महाड शहरात सापळा रचून त्याला अटक करण्यात आली.रायगड जिल्हा पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेला हवालदार विशाल वाघाटे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १० ऑक्टोबर रोजी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास महाड शहरात लाच घेताना रंगेहात पकडले. तक्रारदार हा ३० वर्षीय पुरुष असून, त्याच्यावर पॉक्सो कायद्यांतर्गत कारवाई टाळण्यासाठी आरोपी वाघाटे याने ५ लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने ८ ऑक्टोबर रोजी लाच मागणीची तक्रार अँटी करप्शन ब्युरोकडे दाखल केली.त्यानंतर ०९ ऑक्टोबर रोजी लाच मागणीची पडताळणी करून आरोपीची मागणी खरी असल्याचे स्पष्ट झाले. निर्धारित ठिकाणी म्हणजेच महाड शहरात १० ऑक्टोबर रोजी पहिल्या हप्त्यापोटी ३ लाख रुपये स्वीकारत असतानाच वाघाटेला पथकाने रंगेहात पकडले. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही सापळा कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.पथकामध्ये पोलीस निरीक्षक निशांत धनवडे, पोलीस निरीक्षक नारायण सरोदे, फौजदार विनोद जाधव, अरुण करकरे, सुषमा राऊळ यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. संपूर्ण मोहिमेला अँटी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे आणि सुहास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# घणसोली बेघर निवारा केंद्रात जागतिक बेघर दिनानिमित्त सामाजिक कृतज्ञता कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.११, नवी मुंबई :** १० ऑक्टोबर या जागतिक बेघर दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या घणसोली येथील शहरी बेघर निवारा केंद्रामध्ये सामाजिक कृतज्ञता कार्यक्रम संपन्न झाला. नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली हा कार्यक्रम समाजविकास विभागाच्या उपायुक्त श्रीम. नयना ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाप्रसंगी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने केंद्राकरिता टेलिव्हिजन, वॉशिंग मशीन, उउढत, लॉकर, योगा मॅट, फ्रिज इ. साहित्याचे वाटप करण्यात करण्यात आले. यावेळी स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाचे महाव्यवस्थापक राजेश कुमार, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त शंकर गोरे, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या उपआयुक्त श्रीम.प्रणाली घोंगे आदी मान्यवर उपस्थित होते. नवी मुंबई महानगरपालिका या बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून चांगले काम करीत असल्याबद्दल कौतुक करीत येथील व्यवस्थेबद्दलही मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने लायबिलिटी हेड रंजितकुमार मिश्रा तसेच विभागीय व्यवस्थापक रोहित प्रकाश उपस्थित होते.

# ऐरोली नाटयगृहाच्या आयुक्तांकडून प्रत्यक्ष पाहणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ऐरोली से.५ येथे भूखंड क्र.३७ वर बांधण्यात येत असलेल्या नुतन नाटयगृहाच्या सुरु असलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करीत नवीन वर्षाच्या प्रारंभी काम पूर्ण करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्रत्यक्ष पाहणीअंती दिले. याप्रसंगी आयुक्तांसमवेत शहर अभियंता शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता संजय पाटील व संबधित अधिकारी उपस्थित होते. नवी मुंबई महानगरपालिकेचे वाशी येथे विष्णुदास भावे नाटयगृह असून कला व संस्कृतीप्रेमी रसिकांचा लक्षणीय प्रतिसाद लक्षात घेऊन ऐरोली येथे नवीन नाटयगृह उभारण्याचे काम सुरु आहे.

# आदिवासी आरक्षणात घुसखोरी विरोधात आदिवासींचे उलगुलान वादळ

## मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१२, पालघर :** आदिवासींचे आरक्षण हे संविधानिक असून आदिवासी समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण हे भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीनूसार देण्यात आले आहे. मात्र, एका आंदोलनानंतर बंजारा व धनगर समाजाचे लोक हे हैद्राबाद गॅजेटच्या आधारे अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळवण्यासाठी घुसखोरी करण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रयत्न कदापि यशस्वी होणार नाही. आम्ही राजकीय पक्ष म्हणून नाही, तर समाज म्हणून एकत्र आलो आहोत, असे पालघर जिल्हा आदिवासी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष आमदार विलास तरे यांनी सांगितले आहे.

यावेळी आमदार तरे म्हणाले की, अनुसूचित जमातीची यादी बदलण्याचा अधिकार हा फक्त राष्ट्रपती व भारतीय संसदेस आहे. राज्य सरकारला गॅजेटचा संदर्भ घेऊन अनुसूचित जमातीत अन्य जातीची घुसखोरी करण्याचा अधिकार नाही. हैद्राबाद गॅझेट ला कोणतेही कायदेशीर किंवा संविधानिक बळ नाही. म्हणून हैद्राबाद गॅझेट च्या आधारे धनगर व बंजारा समाजाच्या लोकांना आदिवासींत आरक्षण देवू नयेत व इतर मागण्यांसाठी जिल्ह्यातील ४१ संघटनासुद्धा एकत्र झाल्या आहेत. त्या समाज म्हणून सरकारला जाब विचारण्यासाठी आम्ही दि.१४ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर उलगुलान जन आक्रोश मोर्चा काढणार, असा निर्धार पालघर जिल्ह्यातील चार आमदार, दोन माजी आमदार, खासदार व माजी खासदारांनी रविवारी मनोर येथे प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकी दरम्यान केला. हा मोर्चा पालघर जिल्हा आदिवासी कृती समितीच्या माध्यमातून आयोजित करण्यात येणार आहे.

सरकारला आदिवासींचे अस्तित्व दाखवण्याची वेळ आली आहे. पक्ष नाही समाज म्हणून आम्ही एकत्र आहोत. मोठ्या संख्येने एकत्र येऊन सरकारला आपले अस्तित्व दाखवून देऊ. १५ जातींना आदिवासी लाभ घ्यायचा असून, राज्यातील २५ विधानसभा मतदार संघातील राजकीय आरक्षणावर डोळा असल्याचे सांगत सामाजिक बांधिलकीतून एकत्र येण्याचे आवाहन डॉ. सवरा यांनी केले. आमचा आदिवासी समाज अजून भूमिहीन म्हणून जगतो. पेसा कायदा पूर्णपणे लागू होत नाही. आपण बिंदू नामावलीत आठ नंबरला आहोत. त्यामुळे आपल्या नोकऱ्यांची संख्यासुद्धा कमी झाली आहे.

धनगर, बंजारा, कोळी, ठाकूर व इतर जाती सर्व एस. टी. मध्ये आरक्षण मागतात. एसीमध्ये का मागत नाही, असा सवालही आ. गावीत यांनी उपस्थित केला. निसर्गपूजक असलेल्या आदिवासींनी इतर धर्माची नक्कल करणे सोडले पाहिजे. जल, जमीन, जंगल सरकारकडून हिरावून घेतले जात आहे. बोगस आदिवासींना सरकारचे संरक्षण असल्याचा आरोप केला. आदिवासांचे अस्तित्व धोक्यात आल्याचे ॲड. मीना काळूराम धोदडे यांनी सांगितले. जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या ग्रामसभांचे ठराव घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी खा. डॉ. हेमंत सवरा, आ. राजेंद्र गावीत, माजी आ. श्रीनिवास वनगा, माजी सभापती संतोष बुकले, प्रतिभा गुरोडा, सुरेश रेंजड, सीमा धोदडे, सचिन शिंगडा, ॲड. विराज गडग, आदिवासी सरपंच, विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी, आदिवासी बांधव उपस्थित होते यात सर्वानुमते पालघर जिल्हा आदिवासी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष आमदार विलास तरे यांना करण्यात आले.

> या महाआक्रोश उलगुलान मोर्चात पालघर जिल्ह्यातील जवळपास ६० च्या वर आदिवासी संघटना सहभागी होणार असून ५० हजारां च्या वर आदिवासी बांधव सहभागी होणार असल्याचे आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीने सांगितले आहे. यासाठी पालघर जिल्ह्यातील पालघर, डहाणू, तलासरी, वाडा, विक्रमगड, जव्हार सह मोखाडा आदी ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने आदिवासी बांधव येणार असून त्यांचे जिल्ह्याला येण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे हा आदिवासी चा जिल्ह्यावर आरक्षणामध्ये बंजारा, धनगर घुसखोरी विरोधात ऐतिहासिक मोर्चा होणार आहे.

## राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या वतीने सायक्लोथॉनद्वारे 'गर्भाशय कर्करोग जनजागृती'



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** मेजर संदीप उन्नीकृष्णन - अशोकचक्र यांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय सुरक्षा दल यांच्या वतीने गर्भाशय कर्करोग जनजागृतीसाठी 'सायक्लोथॉन'चे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ७ वाजता मुंबईतून गेट वे ऑफ इंडिया पासून सुरू झालेल्या या सायक्लोथॉनद्वारे राष्ट्रभक्तीचा व आरोग्याविषयी जागरूकतेचा संदेश प्रसारित करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी यामध्ये स्वत: सहभागी होत राष्ट्रभक्तीचा व आरोग्य जनजागृतीचा संदेश प्रसारित केला.मुंबईपासून नवी मुंबईमार्गे पवईपर्यंत जाणाऱ्या या सायक्लोथॉनचा सेक्टर २६, नेरूळ येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई या पर्यटकांचे आवडते ठिकाण असणाऱ्या स्थळावर विशेष थांबा घेण्यात आला. यावेळी किंग हॉस्पिटल मुंबईच्या डॉक्टरांनी गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी पथनाट्य सादर करीत त्याविषयी सविस्तर माहिती दिली.

विशेष म्हणजे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सायक्लोथॉनमध्ये सहभागी होत मुंबईतून गेट वे ऑफ इंडियापासून सुरूवात करून नवी मुंबईतील ज्वेल ऑफ नवी मुंबई हे ४० किमीचे अंतर १ तास ३१ मिनीटात पार केले.यावेळी बोलताना आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी शहीद जवानांना आदरांजली अर्पण करताना त्यासोबतच गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी जनजागृती करण्याचा आरोग्यहिताय उपक्रम राबविणे ही फार मोठी लोकहिताची गोष्ट असून त्याबद्दल कर्नल अभिषेक सिंह आणि त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षा दलातील सहकाऱ्यांची प्रशंसा केली. सध्या बदलत्या जीवनशैलीत कर्करोगाचे प्रमाण वाढलेले दिसत असून त्यातून बचावासाठी लवकर निदान होणे हाच सर्वोत्तम पर्याय असल्याचे ते म्हणाले. त्यादृष्टीने महिलांमधील कर्करोगाचे वाढते प्रमाण चिंताजनक असून याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने सगळ्या रूग्णालयांमध्ये व काही नागरी आरोग्य केंद्रांमध्ये १४ ठिकाणी आठवड्यातून २ दिवस मंगळवार व शुक्रवारी मास स्क्रीनींग सुरू केले आहे. आत्तापर्यंत ७० हजारहून अधिक मास स्क्रीनींग झाले असून त्या तपासणीमध्ये संशयित आढळलेल्या ७ महिलांना पुढील तपासणीसाठी टाटा कॅन्सर हॉस्पिटलला संदर्भित केले आहे. त्यामध्ये निदान झाल्यास त्यांच्यावर पुढील उपचार करण्यात येतील. केमोथेरपीसाठी महानगरपालिकेच्या नेरूळ रूग्णालयात १० बेड्सचा केमोथेरपी वॉर्ड सुरू करण्यात आल्याची ही माहिती त्यांनी दिली. यावेळी कर्नल अभिषेक सिंग यांनी शहीद जवानांचे स्मरण ठेवण्यासाठी तसेच गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी जनजागृती करण्यासाठी मेजर संदीप उन्नीकृष्णन अशोकचक्र हा सायक्लोथॉन उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. यावेळी महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, उपआयुक्त डॉ.अजय गडदे व डॉ.अमोल पालवे तसेच सायक्लोथॉनमध्ये सहभागी राष्ट्रीय सुरक्षा दलाचे जवान, पोलीस व नागरिक आणि एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे महिलांमधील गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी जनजागृती करून, नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

## हॉटेल ताज लँड्स एंड येथे निर्यात क्षेत्रातील उद्योजकांचा होणार सन्मान
## 'महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कारांचे' आज वितरण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, मुंबई :** राज्यातील उद्योजकांनी त्यांच्या अप्रतिम कार्यक्षमतेच्या आणि नवोन्मेषी दृष्टिकोनाच्या बळावर जागतिक बाजारपेठेत भक्कम स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या योगदानाचा गौरव करण्यासाठी राज्य शासनामार्फत महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी हॉटेल ताज लँड्स एंड, मुंबई येथे करण्यात येणार आहे. सन २०२२-२२ आणि २०२३-२४ या वर्षातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल एकूण ६७ उद्योजकांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये ४६ सुवर्ण पुरस्कार, १७ रौप्य पुरस्कार आणि चार प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कारांची निवड आठ श्रेणींमध्ये करण्यात आली असून त्यात निर्यातदार- मोठे उत्पादक घटक, सूक्ष्म, लघु व मध्यम उत्पादक, व्यापारी निर्यातदार, मान्यताप्राप्त निर्यात गृह, व्यापार गृह, लघु उत्पादक निर्यातदारांसाठी प्रादेशिक पुरस्कार, राज्य शासनातील महामंडळे आणि सेवा निर्यातदार यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र निर्यातीमध्ये अग्रगण्य महाराष्ट्राने देशाच्या निर्यातीमध्ये आपले अग्रगण्य स्थान कायम राखले असून, २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याची निर्यात ₹५.५७ लाख कोटी आहे. ही भारताच्या एकूण निर्यातीच्या सुमारे १५.०५ टक्के आहे. राज्यातील पुणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, ठाणे आणि रायगड हे पाच जिल्हे निर्यातीत आघाडीवर आहेत. या जिल्ह्यांचा राज्याच्या एकूण निर्यातीमध्ये ७३ टक्के वाटा आहे.

महाराष्ट्रातून प्रामुख्याने अमेरिका, यु.ए.ई, हाँगकाँग, बेल्जियम, युनायटेड किंगडम, चीन, सौदी अरेबिया, नेदरलँड्स, जर्मनी आणि मेक्सिको या देशांमध्ये रत्ने व आभूषणे, अभियांत्रिकी वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स व विद्युत घटक, रसायने आणि वस्त्रोद्योग या क्षेत्रांतील वस्तूंची निर्यात केली जाते.'महाराष्ट्र निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३'निर्यात वाढीसाठी राज्य शासनाने 'महाराष्ट्र निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३' अंतर्गत अनेक उपक्रम हाती घेतले आहेत.

या धोरणांतर्गत आर्थिक प्रोत्साहने, पायाभूत सुविधा विकास, संस्थात्मक सहाय्य, औद्योगिक क्लस्टरचा विकास, आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनांमध्ये सहभाग आणि लॉजिस्टिक साखळी सुधारणा यांसारखे अनेक लाभ दिले जात आहेत. एक जिल्हा एक उत्पादन या उपक्रमांतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांमधून ७२ उत्पादने निवडली असून, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना निर्यातीकरिता प्रोत्साहन आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या उत्पादनांची ओळख निर्माण करण्यासाठी विशेष सहाय्य दिले जात आहे.

राज्यातील उत्कृष्ट उद्योजकांच्या सन्मानामुळे महाराष्ट्रातील उद्योग जगताला नवे बळ मिळून नवउद्योजकांना प्रेरणा मिळणार आहे. आगामी वर्षाच्या निर्यात पुरस्कारासाठी निर्यातदारांनी अधिक सहभाग नोंदवावा असे आवाहन उद्योग विभागाने केले आहे.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन - धान्य कृषी' योजनेचा शुभारंभ



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, मुंबई :** 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'चा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृह, पुसा, नवी दिल्ली येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे झाला. प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेत राज्यातील ९ जिल्ह्यांची निवड झाली असून केंद्राच्या व राज्य शासनाच्या योजनांच्या माध्यमातून तेथील शेतकऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'च्या दूरदृष्य प्रणालीद्वारे शुभारंभानिमित्त पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात कृषीमंत्री भरणे बोलत होते. यावेळी आमदार बापू पठारे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, रफिक नायकवडी, सुनील बोरकर, अशोक किरनळ्ळी, सहसंचालक दत्तात्रय गावसाने आदींसह राज्यातील कृषी सखी, प्रगतिशील महिला, पुरुष शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतकरी सक्षम व्हावा यादृष्टीने काम करत आहे. यावर्षी जून ते सप्टेंबरपर्यंत राज्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रीमंडळ सदस्यांनी त्या-त्या भागात दौरे करून शेतकऱ्यांचे दु:ख, अडचणी जाणून घेतल्या. या शेतकरी बांधवांना उभे केले पाहिजे यादृष्टीने राज्य शासनाने चांगले पॅकेज जाहीर केले आहे. अनेक ठिकाणी नदीकडेला शेतीत माती राहिली नाही, वीज रोहित्र (ट्रान्सफॉर्मर), वीजपंप राहिले नाहीत. त्यामुळे या नुकसानीसाठी साधारणत: ३१ हजार ६२७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. अजूनही त्यात काही बाबींचा समावेश करण्यात येईल. यात कोरडवाहू शेतीला १८ हजार ५०० रूपये, हंगामी बागायत शेतीला २७ हजार आणि बागायती शेतीला ३२ हजार ५०० रुपये हेक्टरी असे आणि रब्बीसाठी पाणी उपलब्ध आहे अशा ठिकाणी १० हजार कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्यात ३ हजार ५०० कृषी सखी काम करत असून त्या स्वत: प्रशिक्षण घेऊन तेथील महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत. त्याचा अभिमान असून कृषी समृद्धी योजनेच्या माध्यमातून राज्य शासनाने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सुरू केलेल्या मोठ्या योजनेची माहिती घेऊन सेंद्रीय शेतीमधील तंत्रज्ञान, कृषी विभागाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी, शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी कृषी सखींनी मार्गदर्शन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. कडधान्य हे आपल्या आहारातील प्रथिनाचे मुख्य साधन असून आपल्या देशात अजूनही कडधान्याची कमतरता आहे. चना, मूग, तूर, उडीद, मसूर यांचे उत्पादन वाढविण्यात येणार असून भारत आत्मनिर्भर बनणार आहे.

कडधान्याच्या शेतीसाठी खतांचा वापर कमी होत असल्यामुळे नैसर्गिक शेती आणि कडधान्य शेती एकमेकांना पूरक बाबी असल्याने त्याचा जमीनीचा पोत वाढण्यासाठी फायदा होतो. शेतीसाठी सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करा, सेंद्रीय खताचा वापर करावा.

शासनाच्या योजनांचा लाभ घ्या, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा आणि आपल्या शेतीला नवसंजीवनी द्यावी, असे आवाहन करतानाच शेतीसाठी सर्वांनी मिळून एकत्र काम केल्यास महाराष्ट्र राज्य शेतीमध्ये अग्रेसर राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कृषी आयुक्त मांढरे म्हणाले, आपले उत्पादन दुप्पट करण्याचे काम शेतकऱ्यांनी केले आहे. मात्र उत्पन्न दुप्पट न होता उत्पादित पिकाला योग्य बाजारभाव कमी मिळत असल्याने कमी झाले आहे. त्यासाठी उत्पादित कृषीमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्य वाढविणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांनी मालाचा बाजारभाव स्वत: कसा ठरविता येईल यासाठी व्यापारी पद्धतीने विचार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या दृष्टीने विविध विभागाच्या समन्वयाने काम होणे गरजेचे असून त्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असेही ते म्हणाले. आवटे यांनी प्रास्ताविकात या योजनेंतर्गत राज्यातील ९ जिल्ह्यात ५ वर्षाचा आराखडा करून कृषी विकासाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

यावेळी महाडीबीटीच्या माध्यमातून विविध योजनांच्या लाभासाठी सर्वाधिक ४३ लाख १५ हजार शेतकऱ्यांची निवड केल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमात सेंद्रिय शेतीत उत्कृष्ट काम केलेल्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. काही प्रगतिशील महिला शेतकऱ्यांना कार्यक्रमातच पुरस्कार देण्याचा निर्णय कृषीमंत्री भरणे यांनी घेतल्याने या महिलांचा आनंद द्विगुणित झाला. यावेळी कृषीमंत्र्यांनी कृषी सखी, प्रगतिशील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा व सूचना जाणून घेतल्या. याप्रसंगी नैसर्गिक शेतीत चांगले काम केलेल्या शेतकऱ्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी विभागाने तयार केलेल्या नैसर्गिक शेतीविषयक तीन पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले.

### 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'त राज्यातील ९ जिल्ह्यांचा समावेश

'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'त कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाच्या उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या देशातील १०० आकांक्षित जिल्ह्यांची निवड केंद्र शासनाने केली आहे. सद्य:स्थितीमध्ये राज्यामध्ये केंद्र व राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६ हून अधिक केंद्रीय आणि राज्य योजनांच्या अभिसरणाद्वारे पिकांची उत्पादकता वाढवणे, पीक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणे तसेच काढणीपश्चात तंत्रज्ञान व पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येणार आहे. यात महाराष्ट्रातील पालघर, रायगड, धुळे, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झालेली आहे.

### ४२ हजार कोटी रुपयांच्या कृषी योजनांचे उद्घाटन तथा पायाभरणी

४२ हजार कोटी रुपयांच्या कृषी योजनांतर्गत 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना', कडधान्य आत्मनिर्भरता अभियान, कृषी पायाभूत सुविधा निधी, पशुपालन, मत्स्यपालन आणि अन्न प्रक्रिया उद्योग यांचे १ हजार १०० पेक्षा अधिक प्रकल्पांचे उद्घाटन तथा पायाभरणी प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे झाली.

थोडक्यात बातम्या

## ठाणे ते कल्याणपर्यंत धावणार मेट्रो



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१२, ठाणे :** मुंबईत मेट्रो लाइन - ३ पूर्णपणे सेवेत दाखल झाली आहे. मुंबईसह उपनगरात ही आता मेट्रोचं जाळं पसरत आहे. कल्याण, ठाणे, बदलापूरपर्यंत मेट्रो पोहोचणार आहे. आता कल्याण आणि ठाणे यांना जोडणारी मेट्रो - ५ या मार्गिकेचंही काम सुरू होणार आहे. या कल्याण-ठाणे उन्नत मार्गिकेसाठी जवळपास २९२ बांधकामं पाडण्याचं काम हाती घेण्यात येणार आहे. पाडण्यात येणाऱ्या बांधकामामध्ये दुकानं आणि घरांचा देखील समावेश आहे. तसेच, या मेट्रोच्या बांधकामावेळी, मेट्रोच्या उभारणी दरम्यान विविध प्रकारच्या प्रदूषणाची मोठी शक्यता आहे. यामुळेच आता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात चचठ्ठअ या कल्याण-ठाणे मार्गिकेसाठी सामाजिक आणि पर्यावरणीय विश्लेषण करुन त्याचा अभ्यास करणार आहे.

**कसा असेल मेट्रो - ५ चा मार्ग?**

मेट्रो - ५ कल्याण-ठाणे या मार्गिकेचा मार्ग ठाण्यातील कापूरबावडी जंक्शन ते कल्याण येथील कृषी उत्पन्न बाजार समिती या दरम्यान आहे. या मार्गाचा पहिला टप्पा ठाणे ते भिवंडी येथील धामणकर नाकापर्यंत असेल. ठाणे ते भिवंडी धामणकर नाक्यापर्यंतचा मार्ग ११.८९५ किमी इतका लांब आहे. या टप्प्याचं बांधकाम जवळपास ६० टक्क्यांपर्यंत पूर्ण झालं आहे. मेट्रो - ५ कल्याण-ठाणे या मार्गिकेचं बांधकाम 'चचठ्ठअ' स्वत:च्या निधीतून करत आहे. याशिवाय या मार्गासाठी लागणाऱ्या गाड्या, सिग्नल आणि संवाद यंत्रणा तसंच इतर गोष्टींसाठी आशिया इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक वित्तसाह्य, आर्थिक मदत पुरवणार आहे. सध्या कल्याण-ठाणे या मेट्रो - ५ मार्गाची उभारणी सुरू असून त्यात पाणी, हवा, कंपनं, माती आणि आवाजाशी संबंधित अशी विविध प्रदूषणं होण्याची शक्यता आहे. या पर्यावरणीय प्रभावासह या मार्गात एकूण २९२ बांधकामं पाडली जाणार आहेत. त्यात १०८ घरं आणि १८४ दुकानांचा समावेश आहे. काल्हेरमध्ये दुरुस्ती डेपोसाठी २६.७३ हेक्टरसह एकूण २७.२५ हेक्टर खासगी जमीन अधिग्रहित केली जाणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा सामाजिक प्रभावही अतिशय मोठा असणार आहे. या सर्व बाबींचा विचार करुन आता, चचठ्ठअ मेट्रो-५ या मार्गिकेचा सामाजिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या विश्लेषणात्मक अभ्यास करणार आहे.

## नवी मुंबईत लोककल्याण मेळाव्याचे यशस्वी आयोजन



**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.१२, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाले यांच्यासाठी समाजविकास विभागाच्या वतीने तुर्भे विभाग कार्यालयात आयोजित करण्यात आलेला पीएम स्वनिधी अंतर्गत लोककल्याण मेळावा यशस्वी रितीने संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाचे उपसचिव डॉ. पराग गवळी, स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाचे महाव्यवस्थापक श्री. राजेश कुमार, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त श्री.शंकर गोरे, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या उपआयुक्त श्रीम.प्रणाली घोंगे, पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी श्री.नानासाहेब कामटे तसेच नमुंमपा समाजविकास विभाग उपआयुक्त श्रीम.नयना ससाणे, समाजविकास अधिकारी श्री.प्रकाश कांबळे आणि राष्ट्रीय शहरी उपजिवीका अभियानाचे (छणडच्) राज्य अभियान व्यवस्थापक उपस्थित होते. यावेळी उपस्थित फेरीवाले यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच त्यांना येत असलेल्या अडचणी सांगितल्या. यावेळी अर्ज भरताना येणा-या अडचणीं बाबत आढावा घेण्यात आला. याप्रसंगी पीएम स्वनिधी अंतर्गत रुपये १० हजार, २० हजार व ५० हजार रक्कमेच्या कर्जासाठी अर्ज दाखल करण्यात आले, तसेच 'स्वनिधी से समृद्धी' अंतर्गत फेरीवाल्यांचे प्रोफाईलींग करण्यात आले. या उपक्रमामध्ये १७२ लाभार्थी यांनी सहभागी होऊन लाभ घेतला.

## पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेचे नवी मुंबईत यशस्वी आयोजन



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१२, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने रविवार, दि.१२ ऑक्टोबर २०२५ रोजी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबध्द रितीने प्रभावीपणे राबविण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या २६ नागरी आरोग्य केंद्रांमार्फत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे दवाखाने, सोसायटी कार्यालये, रूग्णालये, रेल्वे स्टेशन, बस डेपो, बाजारपेठ, टोल नाके अशा विविध ठिकाणी ६१८ स्थायी, ७६ ट्रांझिट व २७ फिरते मोबाईल अशाप्रकारे ७२१ इतक्या मोठया संख्येने पोलिओ लसीकरण बूथ स्थापन करण्यात आले होते.

'दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी' या घोषवाक्यास अनुसरून घरोघरी जाऊन नागरी आरोग्य केंद्रांमार्फत पोलिओ लसीकरण मोहिमेची जनजागृती करून पोलिओ लसीकरणाची माहिती सर्वदूर पोहचवण्यात आली. लसीकरण बूथवरील २ हजारहून अधिक कर्मचारी, स्वयंसेवक यांच्यामार्फत बालकांना पोलिओ लस पाजण्यात आली. अपेक्षित लाभार्थ्यांपैकी ८६ % बालकांनी पोलिओ लसीचा लाभ घेतला.१०० टक्के लाभार्थींचे पल्स पोलिओ लसीकरण व्हावे याकरिता दिनांक १३ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत घरोघरी जाऊन पल्स पोलिओ डोस देण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला असून ज्या बालकांना रविवारी बूथवर जाऊन डोस घेता आलेला नाही, अशा बालकांसाठी विशेष मोहीम राबविली जात आहे. यासाठी घरांना भेट देणा-या नमुंमपाच्या स्वयंसेवकांना नागरिकांनी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.